लोकमत

# शिवाजी विद्यापीठाची अंतिम सत्राच्या परीक्षा घेण्याची तयारी

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : विविध अभ्यासक्रमांच्या अंतिम सत्रांच्या परीक्षा दि. १ ते ३१ जुलैदरम्यान घेण्याची तयारी शिवाजी विद्यापीठाने केली आहे.

त्याबाबत कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाच्या निर्देशानुसार परीक्षांचे नियोजन आणि वेळापत्रक निश्चित करा, अशी सूचना विद्यापीठाच्या विद्या परिषदेने बुधवारी परीक्षा व मूल्यमापन मंडळाला केली. शैक्षणिक सत्र आणि परीक्षांचे वेळापत्रक निश्चितीसाठी विद्यापीठाने नेमलेल्या प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांच्या अध्यक्षतेखालील १९ सदस्यीय समितीच्या शिफारशी स्वीकारुन त्यावर चर्चा करण्यात आली. ऑनलाईन पद्धतीने विद्या परिषदेची बैठक झाली.

त्यामध्ये कणसे समितीने अंतिम सत्राच्या परीक्षार्थ्यांची परीक्षा दरवर्षीप्रमाणे घेण्यात यावी. यासह परीक्षेचे नियोजन आणि मूल्यमापनाबाबत केलेल्या विविध शिफारशींवर चर्चा करण्यात आली. शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या निर्देशानुसार दि. १ जुलैपासून अंतिम सत्राच्या परीक्षा घेण्याचे वेळापत्रक तयार करावे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सोशल डिस्टन्सिगसह विविध निकषांचे पालन होईल, यानुसार परीक्षांचे नियोजन करण्याची सूचना या परिषदेने केली आहे. विद्या परिषदेने केलेल्या विविध सूचना, शासनाचे निर्देश आणि कणसे समितीच्या शिफारशी विचारात घेऊन परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून अंतिम सत्राच्या परीक्षांच्या नियोजनाचा अंतिम आराखडा तयार केला जाणार आहे. विद्यापीठाच्या शैक्षणिक सत्राची सुरुवात दि. २२ जूनपासून करण्यास विद्या परिषदेने मान्यता दिली असल्याचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी सांगितले.

## शासनाच्या सूचनेनुसार कार्यवाही

विद्या परिषदेने सध्या कणसे समितीच्या शिफारशी मान्य करुन परीक्षांचे नियोजन करण्याची सूचना दिली आहे. मात्र, कोरोनाच्या प्रादुर्भावाची स्थिती व शासनाकडून दि. २० जूननंतर प्राप्त होणाऱ्या सूचनांनुसार आवश्यकते-नुसार नियोजनात बदल करण्यात येईल, असे डॉ. नांदवडेकर यांनी सांगितले.

## २२५ परीक्षा, ७५ हजार विद्यार्थी

अंतिम सत्रातील २२५ परीक्षा होणार आहेत. त्यामध्ये बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी, एम. ए., एम. एस्सी., एम. कॉम., बीबीए, बीसीए, एमसीए, एमबीए, अभियांत्रिकी आणि इतर अभ्यासक्रमांचे एकूण ७५ हजार विद्यार्थी परीक्षा देणार असल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी सांगितले.

# १ जुलैपासून अंतिम वर्ष परीक्षा शक्य

## विद्यापरिषदेच्या सभेत परीक्षा समितीने सुचविले विविध पर्याय

**कोल्हापूर, ता. २७ :** शिवाजी विद्यापीठाने नियुक्त केलेल्या परीक्षा समितीने आपला अहवाल आज विद्यापरिषदेला दिला. यात १ ते ३१ जुलैदरम्यान परीक्षा घेण्यासंदर्भात पर्याय दिले आहेत. तसेच, परीक्षा कशा पद्धतीने घ्याव्यात, सोशल डिस्टस्निंग कसे पाळावे या संदर्भात शिफारशी केल्या आहेत. या सर्व शिफारशींना विद्यापरिषदेने मान्यता दिली.



कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील पदवीच्या पहिल्या आणि दुसऱ्या वर्षाच्या परीक्षा रद्द करण्यात आल्या. तिसऱ्या वर्षाच्या परीक्षा होणार असल्याचे जाहीर करण्यात आले. ही परीक्षा कशी व्हावी, त्याचे स्वरूप कसे असावे हे ठरविण्यासाठी परीक्षा समिती नेमण्यात आली. यात १८ सदस्य होते. या समितीने आज आपला अहवाल विद्यापरिषदेकडे दिला. यात तिसऱ्या वर्षाच्या परीक्षा १ ते ३१ जुलै या कालावधीत घ्याव्यात, असे सुचविले आहे. तसेच, परीक्षांचे स्वरूप कसे असेल, निकाल कधी लागेल, याबाबत विस्तृत विवेचन करण्यात आले आहे.

दरम्यान, राज्य शासनाने तिसऱ्या वर्षाची परीक्षाही रद्द करावी, असा प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पाठविला आहे. याबाबत अद्याप आयोगाने भूमिका स्पष्ट केलेली नाही. ही भूमिका स्पष्ट केल्यावर राज्य शासन काय निर्णय घेणार, यावरच शिवाजी विद्यापीठातील परीक्षांचे भवितव्य अवलंबून आहे, असे विद्यापीठातील विश्वसनीय सूत्रांनी सांगितले.

# अंतिम वर्षाच्या परीक्षा जुलैमध्ये?

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याबाबत विद्यापीठस्तरीय समितीने तयार केलेला अहवाल बुधवारी विद्यापीठाच्या अॅकॅडमिक कौन्सिलसमोर मांडण्यात आला.

ऑनलाइन झालेल्या बैठकीत कौन्सिलने अहवालातील शिफारसींना मान्यता दिली. त्यानुसार राज्य सरकारच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून देण्यात येणाऱ्या निर्देशानुसार १ ते ३१ जुलै या कालावधीत परीक्षांचे नियोजन करण्याची सूचना विद्यापीठाने परीक्षा मूल्यमापन मंडळाला दिल्या आहेत. त्यामुळे अंतिम वर्षाच्या परीक्षा होण्याची शक्यता आहे. तथापि, राज्य सरकार जो निर्णय घेईल, त्याला विद्यापीठ बांधील असणार आहे.



सविस्तर वृत्त...३

# तणाव व्यवस्थापनाबाबत कार्यशाळेत मार्गदर्शन

कोल्हापूर टाइम्स टीम

शिवाजी विद्यापीठाच्यावतीने वाणिज्य व व्यवस्थापनाच्या विद्यार्थी, शिक्षकांसाठी एकदिवसीय ऑनलाइन ताणतणाव व्यवस्थापन कार्यशाळा झाली. कार्यशाळेत कोल्हापूर, सातारा, सांगली व महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागातून ११२ प्राचार्य, प्राध्यापक शिक्षक व विद्यार्थी सहभागी झाले.

डॉ. ए. एम. गुरव यांनी स्वागत केले. पहिल्या सत्रामध्ये डॉ. एस. एस. वेर्णकर यांनी ताणतणाव व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन केले. ते म्हणाले, 'काही प्रमाणात ताण असणे गरजेचे आहे. पण अनावश्यक ताण निर्माण झाला तर अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. अशावेळी हा अनावश्यक ताण कमी करण्यासाठी हा ताण निर्माण होण्याची कारणे शोधली पाहिजेत. ज्या गोष्टी आपल्या हातात नाहीत, याबाबत अतिचिकित्सा करणे सोडून दिले पाहिजे. प्रत्येक काम आनंदाने स्वीकारून ते पूर्ण केले पाहिजे.'

यानंतर एमबीए युनीटचे संचालक डॉ. एच. एम. ठकार यांनी ताणतणावाचे परिणाम याबाबत मार्गदर्शन केले. ते म्हणाले, 'आवश्यकतेपेक्षा अधिक ताण निर्माण झाल्यावर व्यक्तीला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. तणावाचे योग्य व्यवस्थापन न झाल्यास त्याचे गंभीर परिणाम स्वतःला कुटुंबाला, काहीवेळा समाजाला भोगावे लागतात."

डॉ. ए. एम. गुरव यांनी तणावाची कारणे या विषयावर मार्गदर्शन केले. ते म्हणाले, 'सध्या कोविड- १९मुळे आपण सर्व लॉकडाउनमध्ये आहोत. अशा प्रसंगी नेहमीच्या दैनंदिन तणावांपेक्षा वेगवेगळ्या प्रकारचे ताण सध्या डोके वर काढत आहेत. अनावश्यक ताण कमी करण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे.'

कार्यशाळेचे समन्वयन डॉ. ए. एम. गुरव व महेश चव्हाण यांनी केले. डॉ. केदार मारुलकर यांनी आभार मानले. कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे, प्र -कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी मार्गदर्शन केले.

# अंतिम वर्षाच्या परीक्षा जुलैमध्ये

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याबाबत विद्यापीठस्तरीय समितीने तयार केलेला अहवाल बुधवारी विद्यापीठाच्या अॅकॅडमिक कौन्सिलसमोर मांडण्यात आला. ऑनलाइन झालेल्या बैठकीत कौन्सिलने अहवालातील

## अहवालाला अॅकॅडमिक कौन्सिलची मंजुरी

शिफारसींना मान्यता दिली. त्यानुसार राज्य सरकारच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून देण्यात येणाऱ्या निर्देशानुसार १ ते ३१ जुलै या कालावधीत परीक्षांचे नियोजन करण्याची सूचना विद्यापीठाने परीक्षा मूल्यमापन मंडळाला दिल्या आहेत. त्यामुळे अंतिम वर्षाच्या परीक्षा होण्याची शक्यता आहे. तथापि, राज्य सरकार जो निर्णय घेईल, त्याला विद्यापीठ बांधील असणार आहे.

विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील परीक्षा २७ मार्चपासून सुरू होणार होत्या. मात्र करोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर परीक्षा स्थगित करण्यात आल्या. विद्यापीठाच्या परीक्षांचे नियोजन कशा प्रकारे करावे, याबाबत राज्यस्तरावर चर्चा सुरू होती. सरकारच्या उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालयाच्या नेतृत्वाखाली राज्यातील चार विद्यापीठांचे कुलगुरुंचा समावेश असलेली सहा सदस्य समिती नेमली होती. समितीच्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार आपापल्या विद्यापीठ स्तरावर परीक्षांचे नियोजन करण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

दरम्यान, शिवाजी विद्यापीठातील अंतिम वर्षातील ७५ हजार विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये, यासाठी विद्यापीठस्तरीय समितीची स्थापना केली होती. या समितीने अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याबाबत शिफारशी केल्या होत्या. या समितीचे अध्यक्ष प्राचार्य धनाजी कणसे यांच्या अध्यक्षतेखाली हा अहवाल तयार केला होता.

बुधवारी अॅकॅडमिक कौन्सिलसमोर या शिफारसींबाबत सविस्तर चर्चा झाली. चर्चेनंतर अहवाल मान्य करण्यात आला. कौन्सिलतर्फे अहवाल मान्य करून जुलै महिन्यात विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याबाबत सूचना दिल्या असल्या तरी करोना संसर्गाचा वाढता प्रादुर्भाव आणि उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या आदेशांचे पालन करूनच परीक्षांचे नियोजन केले जाईल, असेही कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी स्पष्ट केले.

विद्यापीठ स्तरीय समितीने तयार केलेल्या अहवालामध्ये प्रामुख्याने लेखी, प्रात्यक्षिक, मौखिक परीक्षेचे आयोजन करावे. चाचणी प्रकल्प याबाबतचे अंतर्गत मूल्यमापन केलेले गुणांकन महाविद्यालयांनी सादर करावे, असे स्पष्ट केले होते. पर्यावरण अभ्यास विषयाच्या लेखी परीक्षा न घेता प्रकल्प आणि गुणांवर मूल्यमापन करावे असेही नोंदवले आहे. या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा झाली.

## तीन वर्षातील अंतिम सत्राचे विद्यार्थी

- बीकॉम, बीएस्सी प्रत्येकी १५,०००
- एम कॉम ५,०००
- एमए १,८००
- एमएस्सी २,५००
- बीसीए १,८००
- एमसीए २००
- एमबीए १,०००
- बीबीए १,२००
- अभियांत्रिकी ९,०००
- अन्य ६,४००



पुढारी

# परीक्षा घेण्याबाबत मार्गदर्शक तत्त्वे तयार करा : विद्या परिषदेत सूचना

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

यूजीसी व राज्य शासनाच्या सूचनेप्रमाणे १ जुलै ते ३१ जुलै या कालावधीत पदवीच्या तृतीय वर्षाच्या परीक्षा घेण्याबाबत मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्याच्या सूचना शिवाजी विद्यापीठ विद्या परिषदेच्या बैठकीत देण्यात आल्या. व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे ही बैठक पार पडली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

सध्या पदवी विभागाच्या तृतीय वर्षाच्या परीक्षा घेण्याबाबत बरीच मतमतांतरे सुरू आहेत. शिवाजी विद्यापीठ विद्या परिषदेला डॉ. डी. जी. कणसे यांच्या अध्यक्षतेखाली



शिवाजी विद्यापीठातून...

स्थापन केलेल्या समितीचा अहवाल सादर करण्यात आला. प्रथम व दुसऱ्या वर्षातील विद्यार्थ्यांना गुणदान पद्धती कशी असावी, त्यांचे गुणांकन कसे करावे, याबाबत परीक्षा विभागाला योग्य ती मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यास सांगितले आहे. ज्यांना परीक्षा अर्ज भरण्याची संधी मिळालेली नाही, त्यांना पुन्हा अर्ज भरता येणार का, याबाबतही कणसे समितीने अहवाल दिला आहे.

दि. १ जुलै ते ३१ जुलै या कालावधीत तृतीय वर्षाच्या परीक्षा घेताना महाविद्यालय पातळीवर त्याचे नियोजन कसे असावे, याबाबत विद्या परिषद सदस्यांनी आपल्या सूचना मांडल्या. परीक्षा विभागाकडून तीन-चार दिवसांत नियमावली तयार झाल्यानंतर त्याप्रमाणे नियोजन होण्याची शक्यता आहे. या बैठकीला प्र.कुलगुरू डॉ. डी. टी.शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा विभाग नियंत्रक गजानन पळसे आदी उपस्थित होते.

Kolhapur Edition
28 May, 2020 Page No. 1
Powered by : erelego.com

# अंतिम वर्षाच्या परीक्षेस १५ जुलैपासून प्रारंभ

प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील पदवी व पदव्युत्तरच्या अंतिम वर्षाच्या नियमित परीक्षा १५ ते ३१ जुलै या कालावधीत होतील.तर बॅकलॉग राहिलेले विषयांच्या परीक्षा १ ते १५ जुलै या कालावधीत घेतल्या जाणार आहेत. परीक्षेची पूर्व तयारी करण्यासाठी प्राध्यापकांचे २०२०-२१ हे शैक्षणिक वर्ष २२ जूनपासून सुरू होईल, असा निर्णय विद्यापरिषदेच्या ऑनलाईन बैठकीत बुधवारी घेण्यात आला. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

संचालक उच्च व तंत्रशिक्षण मार्गदर्शक सूचनांनुसार शिवाजी विद्यापीठातील पदवी व पदव्युत्तर अंतिम वर्षाच्या नियमित परीक्षेचे नियोजन १५ ते ३१ जुलै दरम्यान होणार आहे.



- **बॅकलॉगच्या विषयांची परीक्षा १ ते १५ जुलै**
- **२२ जूनपासून प्राध्यापकांचे २०२०-२१ शैक्षणिक वर्ष होणार सुरु**
- **कोरोनाचा संसर्ग वाढल्यास तारखा बदलणार**

पान ६ पहा

## उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या निर्देशानुसार परीक्षा

शिवाजी विद्यापीठ परीक्षेसंदर्भात प्राचार्य कणसे समितीने तयार केलेल्या मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन, तसेच उच्च व तंत्रशिक्षण विभागाने दिलेल्या निर्देशानुसार विद्यापीठातील परीक्षा विभाग पदवी व पदव्युत्तरच्या परीक्षेचे नियोजन करेल.

**कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर (शिवाजी विद्यापीठ)**

तरुण भारत Thu, 28 May 2020 https://epaper.tarunbharat.c

# अंतिम वर्षाच्या परीक्षेस १५ जुलैपासून प्रारंभ

पान १ वरून

बी. ए., बी. कॉम., बीएस.सी. सेमिस्टर सहा आणि एम. ए., एम. कॉम, एमएस. सी. सेमिस्टर चार, तसेच पाच वर्षाचा अभ्यासक्रम आर्किटेक्चर आणि विधी(लॉ) सेमिस्टर दहाच्या परीक्षा होणार आहेत. बॅकलॉग राहिलेल्या विषयांची परीक्षा १ ते १५ जुलै दरम्यान घेतल्या जाणार आहेत. परीक्षे नियोजनासह विद्या परिषदेसमोर २२० विषय ठेवण्यात आले होते. यामध्ये एलआयसी कमिटीच्या अहवालानुसार महविद्यालयांना संलग्नता देणे. युजीसीच्या नियमानुसार संशोधन पेपर कोणत्या जनरलमध्ये प्रसिध्द करायचे. याशिवाय इतर जनरल पाहिजे असतील तर त्यांची यादी विद्या परिषदेला पाठवावी. यासह अन्य विषयावर चर्चा झाली.

**कोरोनाचा प्रादुर्भाव वाढल्यास परीक्षेच्या तारखा बदलणार**

सध्याच्या परिस्थितीत १ ते ३१ जुलै या कालावधीत पदवी व पदव्युत्तर अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याचा निर्णय झाला आहे. मात्र कोरोनाचा संसर्ग वाढल्यास परीक्षेच्या तारखा बदलल्या जाणार आहेत. परिस्थितीनुसार पुन्हा विद्या परिषदेसमोर परीक्षेचा विषय ठेवून परीक्षेच्या तारखा जाहीर केल्या जातील, असेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.

**प्राध्यापकांचे शैक्षणिक वष ‘२२ जूनपासून**

संचालक उच्च व तंत्रशिक्षण मार्गदर्शक सूचनांनुसार १ ते ३१ जुलै या कालावधीत पदवी व पदव्युत्तरच्या परीक्षा घेतल्या जाणार आहेत. या परीक्षांची पूर्व तयारी करण्यासाठी प्राध्यापकांचे २०२०-२१ हे शैक्षणिक वर्ष २२ जूनपासून सुरू होणार आहे. परीक्षा घेण्यासाठी वर्ग खोल्या तयार ठेवणे. जिल्हा प्रशासनाला अलगीकरणासाठी दिलेली वसतिगृह ताब्यात घेवून सॅनिटायझर करणे. प्रश्नपत्रिका तयार करणे यासह सर्वच शैक्षणिक कामाला २२ जूनपासून प्रारंभ होईल.

तरुण भारत Thu, 28 May 2020
https://epaper.tarunbharat.com/c/52297637